**मराठी भाषा (कोड -009) - Objectives**

**इयत्ता- नववी व दहावी (2020-21)**

आपल्या महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी आहे. एकमेकांशी संवाद साधताना, विचारांची देवाणघेवाण - करताना, आपल्या भावना समोरील व्यक्ती समोर मांडताना या भाषेचा प्रभावी व योग्य वापर करणे आवश्यक असते. मराठी भाषा समृद्ध आहे. संस्कृत भाषा ही मराठीची जननी होय.

मराठी भाषेतील वाड.मयाला प्रदीर्घ परंपरा आहे. लिखित वाड.मयाबरोबरच लोक वाड.मयाचीही परंपरा आहे.

'माझा मराठाची बोलू कवतुके|परी अमृतातेही पैजेसी जींके| ऐसी अक्षरेंची रसिके| मेळविन |'अशी प्रतिज्ञा संत ज्ञानेश्वरांनी केली आणि ती तडीस नेली. 'विवेकसिंधु' हा ग्रंथ लिहिणारे आद्य कवी मुकुंदराज,'ज्ञानेश्वरी','अमृतानुभव','चांगदेव पासष्टी' असे ग्रंथ लिहिणारे श्री संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषा संपन्न केली.

'मराठी असे आमुची मायबोली' असे प्रत्येक मराठी माणसाने अभिमानाने म्हटले पाहिजे. मराठीतून बोलणे, मराठीतून पत्रव्यवहार करणे, मराठी वृत्तपत्रे व ग्रंथांचे वाचन करणे, हे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे. महाराष्ट्राची राजभाषा मराठी असलेल्या या महाराष्ट्रात अनेक बोलीभाषा आहेत.

२७ फेब्रुवारी हा ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'जागतिक मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो. श्रवण कौशल्य म्हणजे ऐकणे, भाषण संभाषण कौशल्य म्हणजे बोलणे, वाचन कौशल्य म्हणजे आपल्यासमोरील मजकूर वाचणे, लेखन कौशल्य म्हणजे सुंदर सुवाच्च अक्षरात लिहिणे अशा सर्व कौशल्यांवर प्रभुत्त्व मिळवण्यासाठी मराठी भाषा शिक्षण महत्वाचे आहे.

'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी
अशा सुंदर शब्दात कवी सुरेश भट यांनी माय मराठीवर्णन केले आहे.

**मराठी भाषा शिक्षणाचे उद्देश**

**१. श्रवण कौशल्य-(Listening Skill)**

- विविध प्रसार माध्यमांद्वारे( वर्तमानपत्र, टीव्हीवरील बातम्या, यु मासिके, वार्षिक अंक, प्रसारित होणाऱ्या चर्चा, संवाद) याबाबत स्वतःचे मत निश्चित करता येणे.
- सार्वजनिक ठिकाणी (बस स्थानक, रेल्वे स्थानक, विमानतळ महानगरपालिका, ग्रामसभा, नगरपालिका, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव) केलेल्या सूचनांनुसार आपल्याशी संबंधित असलेल्या सूचना लक्षात घेणे.
- औपचारिक व अनौपचारिक संवाद, संभाषण ऐकून त्यात सक्रिय भाग घेता येणे.
- विविध प्रकारच्या साहित्यातील (कथा, कविता, कादंबरी, नाटक, लेख, प्रवास वर्णन) यांचा भावार्थ समजून घेता येणे.
- विविध साहित्य प्रकाराच्या ध्वनिफिती ऐकून त्यातील स्वराघात, आरोह-अवरोह या वैशिष्ट्यांची जाण होणे。 विविध साहित्यप्रकार ऐकून त्याबाबत मत ठरवता येणे.

**२. भाषण व संभाषण कौशल्य- (Speaking Skill)**

- विविध पद्य प्रकारांना (कविता, भारुड, नाट्यसंगीत, देशभक्तीपर गीते, विडंबन काव्य) यांना चाली लावून त्यांचे सादरीकरण करता येणे.
- विषयानुरूप स्वतःचे स्वतंत्र विचार परखडपणे मांडता येणे (समीक्षा किंवा समीक्षण)
- विविध उपक्रमाचे नियोजन/आयोजन करून त्यात सक्रिय भाग घेता येणे.
  (स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, शिक्षक दिन, मराठी दिन, वृक्षारोपण) यासारखे अनेक विषय भाषण संभाषण कौशल्य यातील बारकावे समजून घेऊन त्याचा योग्य वापर करता येणे.
- प्रसंगानुरूप (दुःख, सुख, आनंद, राग) समोरील व्यक्तीशी संवाद साधून स्वतःचे मत प्रभावीपणे मांडता येणे.

**३. वाचन कौशल्य-(Reading Skill)**

- पाठ्यपुस्तक व पाठ्येतर इतर साहित्याचे (मासिके, वार्षिक अंक, कथा, कादंबरी, नाटक) समजपूर्वक प्रकट वाचन करता येणे.
- विरामचिन्हांची दखल घेऊन (पूर्णविराम,अर्धविराम, प्रश्नचिन्ह, उद्‌गारचिन्ह एकेरी व दुहेरी अवतरण चिन्ह) अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.
- दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना,विचार समजून घेऊन लेखन करता येणे.
- विविध साहित्य प्रकारांचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.
- आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेत स्थळावरील माहितीचे वाचन करता येणे.
- सार्वजनिक ठिकाणी लिहिलेल्या सूचना व माहिती समजपूर्वक वाचून त्याबाबत योग्य विचार करता येणे

**४. लेखन कौशल्य- (WritingSkill)**

- लेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे पालन करता येणे
- वाचलेल्या साहित्याच्या आशयातील मध्यवर्ती विचारांचे लेखन करता येणे.
- दिलेल्या विषयांमध्ये स्वतःच्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.
- म्हणी, वाक्प्रचार, शब्द, शब्दसमूह, आलंकारिक शब्द, सुभाषिते यांचा लेखनात उपयोग करता येणे.
- सामाजिक प्रश्नावर अभ्यासपूर्ण लेखन करता येणे. (उदाहरणार्थ- शेतकरी आत्महत्या, हुंडाबळी, व्यसनमुक्ती, पाण्याचा प्रश्न, राजकारणातील घडामोडींचा समाजावर होत असलेला परिणाम, भ्रष्टाचार, प्रदूषणाचा परिणाम कारणे उपाय योजना, इंटरनेटचा गैरवापर, सायबर क्राईम)
- घटना, प्रसंग, स्वानुभव यांचे तुलनात्मक लेखन करता येणे.
  (बातमी लेखन, वृत्तलेखन, जाहिरात लेखन, संवाद लेखन, पत्रलेखन कथालेखन)
- ऐकलेल्या, अनुभवलेल्या माहितीचे स्वतःच्या शब्दात लेखन करता येणे.
- पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या उपयोजित घटकांवर लेखन करता येणे.

**अध्ययन कौशल्य-**

- संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
- दिलेल्या विषयाचा सखोल अभ्यास करून स्वमत मांडता येणे.
- घटना, प्रसंग, कार्यक्रम या बाबत अभिप्राय मांडता येणे.
- शब्दसमूह, वाक्प्रचार, म्हणी यांचा लेखनात व भाषण संभाषणात प्रभावीपणे वापर करता येणे.
- आंतरजालाचा वापर करून ऑनलाइन व्यवहार करता येणे. तसेच सोशल मीडियाचा योग्य वापर करता येणे.
- संगणकावर उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक ॲप्लिकेशनचा अभ्यासासाठी वापर करता येणे.

- प्रसार माध्यमाद्वारे उपलब्ध होणाऱ्या कलाकृतीचा आस्वाद घेता येणे त्याबाबत चिकित्सक विचार करता येणे.
- विविध सामाजिक समस्या बाबत आपले मत परखडपणे मांडता येणे. **शिक्षकांसाठी सूचना**-ज्ञानाबरोबरच आकलनाला प्राधान्य द्यावे. विद्यार्थ्याला स्वतःचे मत मांडू द्यावे, त्याच्या अभिव्यक्तीला प्राधान्य द्यावे.पाठ,कविता यांची सांगड शाळा बाहेरील जीवनाशी घालून उदाहरणे देऊन मुद्दे पटवून द्यावे. आनंददायी अध्ययन असावे. सकारात्मक विचार रुजवत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा शैक्षणिक साहित्याचा योग्य ठिकाणी वापर करावा शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या भाषाविषयक क्षमताचा विचार करुन विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमता विकसित होण्यासाठी विविध उपक्रम किंवा कृती विद्यार्थ्यांकडून करून घ्याव्यात. सर्व व्याकरण घटकांची उजळणी शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून करून घ्यावी. सराव करून घ्यावा.
- व्याकरणाची उजळणी- शब्दांच्या जाती, प्रयोग, वाक्यांचे प्रकार किंवा वाक्य रूपांतर ,समानार्थी शब्द व विरुद्धार्थी शब्द, लिंग ,वचन, मराठी लेखन नियमाप्रमाणे देणे, विरामचिन्हे, सामान्य रूप, विभक्तिप्रत्यय, समास,काळ याचा सराव करून घेणे. शिक्षकांनी सृजनशील त्याने कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी विद्यार्थ्यांना त्यासाठी प्रेरित करावे यातूनच विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता विचार क्षमता व कृति क्षमता यांना संधी मिळेल.

**Marathi Curriculum (2020 - 2021) Revised**

**Class - IX- Code(009)**

| **अनुक्रम** | **पाठाचे / कवितेचे नाव** | **लेखक/ कवी चे नाव** |
|---|---|---|
| 1 | सर्वात्मका शिवसुंदरा (प्रार्थना) (केवळ वाचनासाठी) | कुसुमाग्रज |
| 2 | संतवाणी -अ- भेटी लागी जीवा आ- संत कृपा झाली | संत तुकाराम संत बहिणाबाई |
| 3 | 'बेटा मी ऐकतो आहे' | व. पु.काळे |
| 4 | जी आय पी रेल्वे | प्रबोधनकार ठाकरे |
| 5 | व्यायामाचे महत्व (कविता) | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज |
| 6 | ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ | बाळ ज. पंडित |
| 7 | दिव्याच्या शोधामागचे दिव्य | डॉ. अनिल गोडबोले |
| 8 | सखू आजी | राजन गवस <u>(omitted)</u> |
| 9 | उजाड उघडे माळरानही कविता | ललिता गादगे <u>(omitted)</u> |
| 11 | आभाळातल्या पाऊलवाटा | -- |
| 13 | तिफन (कविता) | विठ्ठल वाघ |
| 15 | माझे शिक्षक आणि संस्कार | शंकरराव खरात |
| 16 | शब्दांचा खेळ | हेलन केलर |
| | **स्थूल वाचन** | |
| 1 | व्हेनिस | रमेश मंत्री |
| 2 | विश्वकोश | -- <u>(omitted)</u> |

**मराठी भाषा -( द्वितीय भाषा) अक्षरभारती (2017)**

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे - 4**

**Maharashtra State Textbook Production and Curriculum Research, Pune -4**

# Curriculum : Marathi (009) Class- 9th (IX) 2020-21

## Question Paper Pattern प्रश्नपत्रिका प्रारूप

**अभ्यासक्रम मराठी भाषा (009) इयत्ता- नववी 2020-21**

**अभ्यासक्रमाबाबत महत्त्वाचे:**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप- प्रश्नपत्रिकेचे 'अ' आणि 'ब' असे दोन विभाग आहेत**

**'अ' विभाग 40 गुण: सर्व वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न (mcq) अंतर्गत पर्यायांसह.**

**'ब' विभाग 40 गुण: विस्तारात्मक उत्तरासाठी प्रश्न - लघुत्तरी, विस्तारात्मक, स्पष्टीकरणात्मक, रचनात्मक- निबंध, गोष्ट, पत्र इत्यादी. अंतर्गत पर्यायांसह.**

**पाठ्यपुस्तकातील काही घटक- पाठ, कविता इत्यादी वगळण्यात आले आहेत. तासिकांची संख्याही कमी करण्यात आली आहे.**

**व्याकरण**

शब्दांच्या जाती –

- नाम (३ प्रकार),
- सर्वनाम,
- विशेषण,
- क्रियापद,
- अव्यय (शब्दयोगी, उभयान्वयी, क्रियाविशेषण, केवलप्रयोगी)
- लिंग,
- वचन,
- काळ,
- वाक्याचे प्रकार (आज्ञार्थी, विधानार्थी- २ प्रकार, उद्गारवाचक, प्रश्नार्थक),
- समानार्थी, विरुद्धार्थी शब्द (पाठ्यपुस्तकावर आधारित),
- समास (द्विगु, द्वंद्व - ३ प्रकार , अव्ययीभाव)

## Paper Pattern

**विभाग ‘अ’- गुण 40**

| घटक<br>Unit | उपघटक आणि विवरण<br>Sub-Unit &<br>Description | प्रश्न प्रकार<br>Types of<br>Questions | प्रतिप्रश्न गुण व<br>एकूण गुण<br>Total Marks |
|---|---|---|---|
| आकलन<br>अपठित गद्य | एक अपठित गद्यांश अंदाजे (150-200 शब्द) | बहुपर्यायी (mcq)<br>(सात पैकी पाच उत्तरे) | 1 x 5 =5 |
| अपठित गद्य | एक अपठित गद्यांश<br>अंदाजे (150-200 शब्द) | बहुपर्यायी (mcq)<br>(सात पैकी पाच उत्तरे) | 1 x 5 =5 |
| व्याकरण | सर्व व्याकरणावर आधारित -<br><br>शब्दांच्या जाती, ----------<br>काळ-ओळखा व बदला-- वाक्याचे प्रकार-<br>(आज्ञार्थी’ विधानार्थी’ उद्गारवाचक,<br>प्रश्नार्थक)--------------------<br>समानार्थी शब्द- (पाठ्य पुस्तकावर आधारित<br>)----<br>विरुद्धार्थी शब्द- (पाठ्य पुस्तकावर<br>आधारित)-----<br>लिंग - बदला --------------<br>वचन - बदला--------------<br>समास ओळखा -(द्विगु,अव्ययीभाव,<br>द्वंद्व-3प्रकार) ----------- | बहुपर्यायी(mcq)<br><br>5 पैकी 4, 4 x1 = 4<br>4 पैकी 3, 3 x 1= 3<br><br><br>4 पैकी 3, 3 x 1= 3<br><br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br><br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br>3 पैकी 2, 2 x 1= 2<br><br>3 पैकी 2, 2 x 1= 2 | 1 x 20 = 20<br><br><br><br><br><br><br>(28 पैकी 20) |
| पाठ्यपुस्तक<br>गद्य | पठित गद्यांश (अंदाजे100-120 शब्द)त्यावर आधारित प्रश्न | बहुपर्यायी (mcq)<br>6 पैकी 5 | 5 x 1= 5 |
| पद्य ( कविता) | पठित पद्य - (अंदाजे 8-10 ओळी) यावर आधारित प्रश्न | बहुपर्यायी (mcq)<br>6 पैकी 5 | 5 x 1= 5 |

विभाग - ब - 40 गुण

| घटक<br>Unit | उपघटक आणि विवरण<br>Sub-Unit & Description | प्रश्न प्रकार<br>Types of Questions | प्रतिप्रश्न गुण व एकूण गुण<br>Total Marks |
|---|---|---|---|
| साहित्य-गद्य (धडे) | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा<br>(अंदाजे 40- 50 शब्दात) | दिर्घोत्तरी 4 पैकी 2 | 2 x 2= 4 |
| पद्य (कविता) | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा | दिर्घोत्तरी 2 पैकी 1 | 1 x 2= 2 |
| स्थूल वाचन<br>Supplimentary Reader | एका वाक्यात उत्तरे लिहा | लघुत्तरी3 पैकी 2 | 2 x 1= 2 |
| लेखन | निबंध लेखन (आत्मवृत्त/ वर्णनात्मक/ कल्पनात्मक ) | विस्तारात्मक लेखन<br>3 पैकी 1 | 1 x 8= 8 |
| | मुद्द्यांवर आधारित गोष्ट लिहा<br>( शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) | विस्तारात्मक लेखन<br>2 पैकी 1 | 1 x 7= 7 |
| | औपचारिक पत्र लेखन (लिफाफा आवश्यक) | विस्तारात्मक लेखन<br>2 पैकी 1 | 1 x 5= 5 |

**Internal exam: Based on student’s timely online submission, online assessment, notebook attachment (Question/Answers, creative writing etc)**
**Homework, Classwork, Periodic test, Subject Enrichment/Portfolio 20 = marks**

**Note - (Some of the above assessments/evaluations are possible only after school re-opens. Otherwise only online submissions will be considered.)**

**Curriculum : Marathi Code (009) Std : 10 For 2020-21**
**अभ्यासक्रम : मराठी (009) इयत्ता : दहावी 2020-21**

| अनुक्रम | पाठाचे / कवितेचे नाव | लेखक/ कवीचे नाव |
|---|---|---|
| 1 | तू बुद्धी दे – प्रार्थना ( केवळ वाचनासाठी ) | गुरु ठाकूर |
| 2 | संतवाणी -अ) अंकिला मी दास तुझा | संत नामदेव |
| 3 | शाल | रा. ग. जाधव |
| 4 | उपास | पु. ल. देशपांडे |
| 5 | दोन दिवस (कविता) | नारायण सुर्वे |
| 6 | चुडीवाला | जयश्री रुईकर |
| 7 | फूटप्रिंटस | डॉ. प्रदीप आवटे (omitted) |
| 8 | ऊर्जा शक्तीचा जागर | डॉक्टर रघुनाथ माशेलकर |
| 9 | औक्षण ( कविता) | इंदिरा संत |
| 10 | रंग साहित्याचे | --- |
| 15 | खरा नागरिक | सुहास बारटक्के |
| 16 | स्वप्न करू साकार | किशोर पाठक (omitted) |
| | **स्थूल वाचन** | |
| 1 | मोठे होत असलेल्या मुलांनो .. | डॉक्टर अनिल काकोडकर |
| 2 | व्युत्पत्ती कोश | (omitted) |

**मराठी भाषा -( द्वितीय भाषा) अक्षरभारती (2018)**

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे - 4**
**Maharashtra State Textbook Production and Curriculum Research, Pune -4**

## Curriculum: Marathi (009) Class- 10th (X) 2020-21

# Question Paper Pattern प्रश्नपत्रिका प्रारूप

**अभ्यासक्रम मराठी भाषा (009) इयत्ता- दहावी 2020-21**

**अभ्यासक्रमाबाबत महत्त्वाचे:**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप- प्रश्नपत्रिकेचे 'अ' आणि 'ब' असे दोन विभाग आहेत**
**'अ' विभाग 40 गुण: सर्व वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न (mcq) अंतर्गत पर्यायांसह.**
**'ब' विभाग 40 गुण: विस्तारात्मक उत्तरासाठी प्रश्न - लघुत्तरी, विस्तारात्मक, स्पष्टीकरणात्मक, रचनात्मक- निबंध, गोष्ट, पत्र इत्यादी. अंतर्गत पर्यायांसह.**
**पाठ्यपुस्तकातील काही घटक- पाठ, कविता इत्यादी वगळण्यात आले आहेत. तासिकांची संख्याही कमी करण्यात आली आहे.**
**व्याकरण**

शब्दांच्या जाती –

- नाम (३ प्रकार),
- सर्वनाम,
- विशेषण,
- क्रियापद,
- अव्यय (शब्दयोगी, उभयान्वयी, क्रियाविशेषण, केवलप्रयोगी)
- लिंग,
- वचन,
- काळ,
- वाक्याचे प्रकार (आज्ञार्थी, विधानार्थी- २ प्रकार, उद्गारवाचक, प्रश्नार्थक),
- समानार्थी, विरुद्धार्थी शब्द (पाठ्यपुस्तकावर आधारित),
- समास (द्विगु, द्वंद्व - ३ प्रकार , अव्ययीभाव)

Paper Pattern　　　　　　　　　　　विभाग 'अ'- गुण 40

| घटक<br>Unit | उपघटक आणि विवरण<br>Sub-Unit & Description | प्रश्न प्रकार<br>Types of Questions | प्रतिप्रश्न गुण व एकूण गुण<br>Total Marks |
|---|---|---|---|
| आकलन<br><br>अपठित गद्य | एक अपठित गद्यांश अंदाजे (150-200 शब्द) | बहुपर्यायी (mcq)<br>(सात पैकी पाच उत्तरे) | 1 x 5 =5 |
| अपठित गद्य | एक अपठित गद्यांश<br>अंदाजे (150-200 शब्द) | बहुपर्यायी (mcq)<br>(सात पैकी पाच उत्तरे) | 1 x 5 =5 |
| व्याकरण | सर्व व्याकरणावर आधारित -<br><br>शब्दांच्या जाती, -----------<br>काळ-ओळखा व बदला-- वाक्याचे प्रकार- (आज्ञार्थी' विधानार्थी' उद्गारवाचक, प्रश्नार्थक)--------------------<br>समानार्थी शब्द- (पाठ्य पुस्तकावर आधारित )----<br>विरुद्धार्थी शब्द- (पाठ्य पुस्तकावर आधारित)-----<br>लिंग - बदला --------------<br>वचन - बदला--------------<br>समास ओळखा -(द्विगु,अव्ययीभाव, द्वंद्व-3प्रकार) ----------- | बहुपर्यायी(mcq)<br><br>5 पैकी 4,  4 x1 = 4<br>4 पैकी 3,  3 x 1= 3<br><br>4 पैकी 3,  3 x 1= 3<br><br>3 पैकी 2,  2 x 1= 2<br><br>3 पैकी 2,  2 x 1= 2<br>3 पैकी 2,  2 x 1= 2<br>3 पैकी 2,  2 x 1= 2<br>3 पैकी 2,  2 x 1= 2 | 1 x 20 = 20<br><br>(28 पैकी 20) |
| पाठ्यपुस्तक गद्य | पठित गद्यांश (अंदाजे100-120 शब्द)त्यावर आधारित प्रश्न | बहुपर्यायी (mcq)<br>6 पैकी 5 | 5 x 1= 5 |
| पद्य ( कविता) | पठित पद्य - (अंदाजे 8-10 ओळी) यावर आधारित प्रश्न | बहुपर्यायी (mcq)<br>6 पैकी 5 | 5 x 1= 5 |

# विभाग - ब - 40 गुण

| घटक<br>Unit | उपघटक आणि विवरण<br>Sub-Unit & Description | प्रश्न प्रकार<br>Types of Questions | प्रतिप्रश्न गुण व<br>एकूण गुण<br>Total Marks |
|---|---|---|---|
| साहित्य- गद्य<br>(धडे) | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा<br>(अंदाजे 40- 50 शब्दात) | दिर्घोत्तरी 4 पैकी 2 | 2 x 2= 4 |
| पद्य (कविता) | अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा | लघुत्तरी(VSA) 5 पैकी 3 | 3 x 1= 3 |
| | संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा | दिर्घोत्तरी 2 पैकी 1 | 1 x 2= 2 |
| स्थूल वाचन<br>Supplimentary Reader | एका वाक्यात उत्तरे लिहा | लघुत्तरी 3 पैकी 2 | 2 x 1= 2 |
| लेखन | निबंध लेखन<br>(आत्मवृत्त/ वर्णनात्मक/ कल्पनात्मक ) | विस्तारात्मक लेखन<br>3 पैकी 1 | 1 x 8= 8 |
| | मुद्द्यांवर आधारित गोष्ट लिहा<br>( शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) | विस्तारात्मक लेखन<br>2 पैकी 1 | 1 x 7= 7 |
| | औपचारिक पत्र लेखन (लिफाफा आवश्यक) | विस्तारात्मक लेखन<br>2 पैकी 1 | 1 x 5= 5 |

**Internal exam: Based on student's timely online submission, online assessment, notebook attachment (Question/Answers, creative writing etc)**
**Homework, Classwork, Periodic test, Subject Enrichment/Portfolio 20 = marks**

**Note – (Some of the above assessments/evaluations are possible only after school re-opens. Otherwise only online submissions may be considered.)**

इयत्ता नववी - मराठी (009)

Omitted Portion (30%) from previously adopted Text book portion.

| Unit Name | Reduction in syllabus | Number of periods reduced | Rationale/ Justification |
|---|---|---|---|
| भाग - 2 पाठ क्रमांक - 8 | सखू आजी (पाठ)<br>Sakhu Aji | 10(approx.) | The language is difficult to understand for the students |
| भाग- 3 कविता क्रमांक- 9 | उजाड उघडे माळरानही (कविता)<br>Ujad Ughade Malranhi | 10(approx.) | The language difficult to understand by the students |
| भाग - 4 स्थूलवाचन | विश्वकोश ( स्थूलवाचन )<br>Vishwakosh | 10(approx.) | It’s difficult to give them hands on experience about Vishwakosh |

इयत्ता दहावी - मराठी (009)

Omitted Portion (30%) from previously adopted Text book portion.

स्वीकृत पाठ्यक्रमातून कमी केलेला (30%) भाग

| Unit Name | Reduction in Syllabus | Number of periods reduced | Rationale/Justification |
|---|---|---|---|
| भाग - 2 पाठ क्रमांक- 7 | फूटप्रिंटस ( पाठ ) | 10(approx.) | The concept discussed in this lesson is already known and seems repetitive. |
| भाग - 4 कविता क्रमांक -16 | स्वप्न करू साकार (कविता) | 10(approx.) | Seems difficult to understand for the students. |
| भाग - 4 स्थूलवाचन | व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन ) | 10(approx.) | Seems difficult to understand for the students. |

Though the reduced syllabus is lesser than 30% of actual syllabus but for Marathi already the syllabus is less.So it’s okay to reduce this much portion as per Marathi Course Committee.